# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३**

## पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

## कपात सूचनांची एकूण संख्या - ९

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: वाय-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता**<br>**बाब क्रमांक: ४५९, रूपये:- ३४,६१,००,००,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (१) | ६२२७ | १० | अमरावती जिल्हयातील 105 गावे वाढीव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (विश्रोळी) ही योजना महाराष्ट्र जिवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग अमरावती यांचेकडून खारपाणपट्याकरिता सन 2008 मध्ये मंजूर झालेली 105 गावाकरिता विश्रोळी धरणातून राबविण्यात येत असून सन 2023 च्या 2 लाख 65 हजार 400 लोकसंख्येकरिता दरडोई 40 लिटर याप्रमाणे संकल्पीत करण्यात आलेली होती व त्यानुसार सुरु असणे, या योजनेअंतर्गत तिवसा मतदारसंघातील भातकुली तालुक्यातील बहुतांश गावे खारपाणपट्यातील असल्यामुळे शेवटच्या गावापर्यंत नागरिकांच्या पाणी पोहचू शकत नाही व मिळणारे पाणी हे 3 ते 4 दिवसाच्या कालावधीने मिळत असणे, या योजनेतील खारपाणपट्यातील गावांमध्ये शेवटच्या टोकापर्यंत लोकांना दरदिवशी नियमित पाणी मिळेल याअनुषंगाने रु. 202.40 कोटी किंमतीचा सुधारीत प्रस्ताव मंडळ कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला असणे या प्रस्तावस मान्यता देवून रु. 202.40 कोटी निधी मंजुर करणेबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संग्राम थोपटे** |
| (२) | ६२२८ | १० | पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील मौजे हिंजवडी या ग्रामपंचायत ग्रामपंचातीस दैनंदिन तीस लक्ष लिटर पाणीपुरवठा उपलब्ध होण्याबाबत व ग्रामपंचायत मान तालुका मुळशी या ग्रामपंचायतीस दैनंदिन पस्तीस लक्ष लिटर पाणीपुरवठा करणे बाबत माननीय लोकप्रतिनिधी यांनी सातत्याने पाठपुरावा करूनही प्रस्तुत चा विषयी अनेक महिन्यापासून प्रलंबित असून या दोन्ही ग्रामपंचायतींची वाढती लोकसंख्या विचारात घेता त्यांना वाढीव पाणीपुरवठ्याची अत्यंत गरज असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ६२२९ | १० | पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील मौजे मारुंजी हे गाव टप्पा क्रमांक दोन समाविष्ट असणे तथापि मौजे मारून या गावाची मोठी ग्रामपंचायत असून त्याची लोकसंख्या सुमारे एक लाखापर्यंत असणे टप्पा क्रमांक दोन मधून वाढते नागरिकीकरण लक्षात घेता सदरची पाणीपुरवठा योजना होणे अशक्य असून सदरची |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | योजना टप्पा क्रमांक दोन मधून वगळून स्वतंत्र योजना स्वतंत्र योजना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बाळासाहेब थोरात** |
| (४) | ६१९५ | १०० | जलजीवन अभ्रियानाच्या अमलबजावणीसाठी राज्य हिस्सा म्हणून ३२५३ कोटी आणि जलजीवन अभियानांतर्गत सहाय्यीकृत बाबींसाठी राज्य हिस्सा म्हणून २०८ कोटी अशी एकूण ३४६१ कोटीची अतिरिक्त मागणी प्रस्तावित करण्यात आली असणे, जलजीवन मिशन योजनेसाठी मिळालेला निधी जीवन प्राधिकरणाकडे वळविण्याबाबत केंद्र शासनाकडून जलजीवन मिशनसाठी राज्यातील 28 जिल्ह्यांसाठी मिळालेला एकूण 42 हजार कोटी इतका निधी शासनाच्या दिरंगाईमुळे परत गेला असणे, जलजीवन मिशनच्या निकषानुसार विहित मर्यादेत निधी खर्च न केल्यामुळे हजारो कोटींचा निधी परत गेला याबाबत चौकशी करुन जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, या निधीतून संबंधित जिल्हा परिषदांनी हाती घेतलेल्या योजना पूर्ण करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (५) | ६२०४ | १०० | राज्यात पालघर जिल्ह्यातील डहाणूच्या पश्चिम किनार पट्टीवरील २९ गावे तसेच खेडोपाड्यांना पुरेश्या प्रमाणात पाणीपुरवठा करण्यासाठी बाडा पोखरण प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेंतर्गत मागील १० वर्षात कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करूनही अध्याप पर्यंत ही पाणीपुरवठा योजना अपूर्ण राहिली असल्याने या परिसरातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे माहे.ऑक्टोबर २०२३ मध्ये निदर्शनास येणे, डहाणूच्या बंदरपट्टी भागातील लोकांना शुद्ध व पुरेश्या प्रमाणात पाणीपुरवठा व्हावा या उदात्त हेतूने सन १९८९ मध्ये बाडा पोखरण योजेनेसाठी मंजुरी देऊन कोट्यावधी रुपयांचा निधी देणे, सन १९९६ ला ही योजना ठाणे जिल्हा परिषदेच्या ताब्यात देण्यात आली. मात्र, या योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याने रोजच्या रोज जलवाहिनी फुटून लोकांना पाणी मिळणे कठीण झाले होते, त्यामुळे नंतर या योजनेला १० वर्ष पूर्ण झाल्याने बाडा पोखरण पाणीपुरवठा योजना जीर्ण होऊन कालबाह्य झाल्याने तत्कालीन लोकप्रतिनिधींनी या योजनेच्या सर्व्हेसाठी निधी दिलेला असणे, उक्त योजनेस नूतनीकरणासाठी सन २०१३ ला मंजुरी देऊन कोट्यावधी रुपयांचा पुन्हा निधी दिला मात्र, कंत्राटदाराने काम पूर्णन करताच सन २०२२ ला योजेनेचे काम अर्धवट सोडून देणे, बाडा पोखरण योजने साठी कोट्यावधीचा निधीची उधळण करूनही अधिकारी व कंत्राटदारांचा उदासीनतेमुळे या परिसरातील २९ गावे तसेच खेडोपाड्यांना पाण्याविना वंचित राहावे लागत असल्याने येथील ग्रामस्थांना पाणीची तीव्र समस्या निर्माण होणे, त्यामुळे बाडा पोखरण योजनेचे अपूर्ण राहिलेले काम तात्काळ पूर्ण करून येथील ग्रामस्थांना कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची सोय आवश्यकता, यावर शासने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. जयंत पाटील** |
| (६) | ६२२३ | १० | जलजिवन मिशन अंतर्गत आहीरवाडी येथे जॅकवेल, उंच टाकी बांधणे, वितरण व्यवस्था, जलशुध्दीकरण केंद्र, पंपिंग मशिनरी इत्यादी कामे मंजूर असणे, त्यासाठी रुपये 179300 लाख रक्कम मंजूर केलेले असणे, तथापि सदरचे काम फक्त 11 टक्केच झाले असणे, याबाबत नागरीकांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असणे, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.. |
| (७) | ६२२४ | १० | जलजिवन मिशन अंतर्गत दुधारी येथे उंच टाकी बांधणे व पंपिंग मशिनरी, वितरण व्यवस्था दाबनलिका इत्यादी कामे करणेसाठी रुपये 95.00 लाख मंजूर करण्यात आलेले असणे, सदरचे काम मंजूर असून अद्याप पाण्याच्या टाकीचे काम सुरु नसणे, सदरचे काम मार्च, 2024 अखेर पूर्ण होण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ६१७६ | १०० | चौके, ता.राजापूर, जि.रत्नागिरी या गावात माहे फेब्रुवारी-मार्च नंतर पाण्याची टंचाई निर्माण होणे, भविष्यात पाण्याची टंचाई होवू नये याकरिता चौके कामनोळयाचा वहाळ येथे पाणी साठवण बंधारा बांधून भडेकर वाडीपर्यंत पाईप लाईन करणे असा ठराव ग्रामपंचायत तारळ चौके यांनी करणे, तथापि त्यासाठी लागणारा निधी ग्रामपंचायत व १५ व्या वित्त आयोगाकडून प्राप्त झालेल्या निधीमध्ये उपलब्ध नसणे, त्यामुळे पिण्याच्या पाण्याची होणारी गैरसोय टाळण्यासाठी चौके कामनोळयाचा वहाळ येथे साठवण बंधारा बांधण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ६२२२ | १०० | जलजिवन मिशन अंतर्गत साठवेवाडी येथे उंचटाकी बांधणे, वितरण व्यवस्थापंपिंग मशिनरी बसविणे इत्यादी कामे मंजूर असणे, त्यासाठी रक्कम रुपये 102.00 लाख इतका निधी मंजूर असणे, सदरचे काम अद्याप सुरु नसणे, सदरचे काम सुरु करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : ११ डिसेंबर, २०२३**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर